# श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय चिखली जि. बुलडाणा
# राष्ट्रीय सेवा योजना
# विशेष श्रम संस्कार शिबिर
# अहवाल
## दि. २८ डिसेंबर २०१८ ते ३ जानेवारी २०१९

**दि. २८/१२/२०१८** रोज शुक्रवार ला दुपारी २.०० वाजता दत्तक ग्राम सातगांव भुसारी ता. चिखली जि. बुलडाणा येथे रासेयो स्वयंसेवकाचे आगमन झाले. त्यानतर रासेयो स्वयंसेवकांनी परिसराची स्वच्छता, शौचालयाचे नियोजन शिबिराची पुर्वतयारी, प्रकल्प पाहणी व श्रमदानाच्या दृष्टिने साहित्य तयार केले.

**दि. २९/१२/२०१८** रोज शनिवार ला सकाळी ९.०० वाजता ग्राम प्रबोधनाच्या दृष्टीने प्रभातफेरी काढण्यात आली आणि त्यानंतर शाळा व शाळेच्या जवळील परिसरात २० शोषखड्डे खणुन काढले. दुपारी २.५० वाजता रासेयो स्वयंसेवकांची सहा गटात विभागणी करुन कामाची जबाबदारी सोपविण्यात आली.

सायंकाळी ५.०० वाजता **उद्घाटन समारंभ** आयोजित करण्यात आले याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल एम. गारोडे, प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. पी. एस. वायाळ, मा. श्री. प्रविण सोनवणे ( उपनिरिक्षक चिखली) विशेष उपस्थिती श्री बाबुराव देशमुख (सरपंच) श्रीमती विमल आत्माराम लोखंडे (उपसरपंच) श्री निलेश पाटील (पोलिस पाटील) श्री बळीराम भुतेकर (मुख्याध्यापक) उपस्थित होते. या प्रसंगी मान्यवरांनी शिबिराला शुभेच्छा देऊन रितसर उदघाटन केले या कार्यक्रमाचे सुत्र संचालन मिलिंद पाटोळे (B.A. I) प्रास्ताविक प्रा. डॉ. वि. रा. पडवाल व आभार कु. शुभांगी पवार( B.Sc. II) हिने केले. त्यानंतर रात्री ८.०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून रासेयो स्वयंसेवकांनी गावकऱ्यांच्या दृष्टिने प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर केले.

**दि. ३०/१२/२०१८** रोज रविवार ला सकाळी ८.०० वाजता **माहिती दूत** म्हणून रासेयो स्वयंसेवकांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती गावकऱ्यांनी दिली. त्यानंतर ९.३० वाजता रासेयो स्वयंसेवकांनी श्रमदानाकरीता प्रकल्पाकडे प्रस्थान केले.

दुपारी २.३० वाजता **मानवी हक्क** या विषयावर प्रमुख मार्गदर्शन प्रा. डॉ. जे.जे. जाधव यांनी रासेयो स्वयंसेवकांना मानवी हक्क, कर्तव्य व शासन या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारी ४.०० वाजता **स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन** या विषयावर मा. श्री. कुणाल झाल्टे (नायब तहसिलदार, चिखली) यांनी विविध उदा. देऊन स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी या बद्दल मार्गदर्शन केले.

**दि. ३१/१२/२०१८** रोज सोमवार ला सकाळी ८.०० वाजता **पशु चिकित्सा** शिबिर मा. डॉ. एस. आर. दांडगे (पशुधन विकास अधिकारी, चिखली) व श्री. एस. आर. गायकवाड (पशुधन पर्यवेक्षक, चिखली) यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील २५० पशुची तपासणी करुन लस देण्यात आली. दुपारी २.३० वाजता **ग्रामगीता, व्यसनमुक्ती व अंधश्रध्दा** या विषयावर मा. श्री. दिपक महाराज सावळे यांनी विविध ओवी सांगुन ग्रामगीतेचा संबंध ग्रामविकास , अंधश्रध्दा व व्यसनमुक्तीशी जोडुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. श्री. डी.बी. बोबडे सर होते.

दुपारी ४.०० वाजता **राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे अहिंसात्मक विचार** या विषयावर प्रा. डॉ. गणेश मालटे व प्रा. डॉ. कु. अनुराधा मुळे यांनी मार्गदर्शन केले.

**दि. ०१/०१/२०१९** रोज मंगळवार ला सकाळी ८.३० वाजता **महिला आरोग्य शिबिर** मा. डॉ. सौ. विद्युषा पोहरकर व डॉ. अनुराधा गोरोडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिरात १५० महिलांची तपासणी करुन औषध देण्यात आले.

दुपारी २.३० वाजता शासनाच्या जनसामान्यांसाठी **विविध योजना** या विषयावर मा. श्री. सुर्यकांत भुजबळ (गटविकास अधिकारी पं. स. चिखली) व मा. श्री. भास्कर जायभाये (सहा. गटविकास अधिकारी पं. सं. चिखली) यांनी मार्गदर्शन केले.

रात्री ८.०० वाजता वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रबोधनपर भजनसंध्या कार्यक्रम मा. श्री. प्रा. डी.बी. बोबडे व त्यांचा संच यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

**दि. २/१/२०१९** रोज बुधवार ला सकाळी ८.०० वाजता **दंत व नेत्र चिकित्सा शिबिर** डॉ. योगेश काळे व मा. डॉ. राहुल जोशी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या शिबिरात २१० रुग्णांची तपासणी करुन औषध देण्यात आले.

दुपारी २.३० वाजता **शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती** या विषयावर मा. श्री भागवत खरात (मंडळ अधिकारी, चिखली) व मा. श्री. दिनेश ल. लम्बे (कृषी पर्यवेक्षक, चिखली) यांनी रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**दि. ०३/०१/२०१९** रोज गुरूवार ला सकाळी ८.०० वाजता माहिती दुत म्हणुन रासेयो स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना शासनाच्या विविध योजना याबद्दल माहिती दिली.

दुपारी १२.०० वाजता **समारोपीय कार्यक्रम** संपन्न झाले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डी. बी. बोबडे, प्रमुख अतिथी म्हणुन मा. प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, व प्रा. डॉ. जे. जे. जाधव, विशेष उपस्थिती म्हणुन मा. श्री बाबुराव देशमुख, माजी सरपंच - मा. राजाराम बरडे, माजी उपसरपंच - श्री. संतोषराव पाटील व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. निलेश गावंडे यांनी रासेयो स्वयंसेवकांच्या श्रमदानाचे कौतुक केले व तरुण परिवर्तनाचा शिल्पकार असल्यांचे सांगीतले. या ठिकाणी शिबिरात उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल प्रमोद खरात व कु. शुभांगी पवार (B.Sc. II & III) यांनी उत्कृष्ठ रासेयो स्वयंसेवक म्हणून पुरस्कृत करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन कु. पुजा बंगाळे व बबन डुकरे (B.Sc- I) यांनी केले व प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. वि. रा. पडवाल व आभार प्रदर्शन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सौ. एस. एम. कलाखे यांनी कले.. या कार्यक्रमाच्या शेवटी शिवमुद्रा गृपच्या वतीने सरपंच श्री बाबुराव देशमुख यांना राजमुद्रा भेट म्हणून देण्यात आली. कार्यक्रमाचा शेवट रासेयो प्रार्थनेने करण्यात आला

# विशेष प्रकल्प

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक व गावकऱ्यांच्या माध्यमातुन खालील विविध प्रकल्प व चिकित्सा शिबिर राबविण्यात आले. सदर विविध प्रकल्पांचे आर्थिक मुल्यांकन खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) शोषखड्डे | - २० | - १०,०००/- |
| २) चर | - १२०० मिटर | - ६०००/- |
| ३) शेततळे | - ३८x५०x९ | - ९०,०००/- |
| ४) दंतचिकित्सा शिबीर | - ११० | - ११,०००/- |
| ५) नेत्र चिकित्सा शिबीर | - १०० | - १०,०००/- |
| ६) महिला आरोग्य शिबिर | - १६० | - १६,०००/- |
| ७) पशुचिकित्सा शिबिर | - २५० | - १२,५००/- |
| | | १,५५,५००/- |

कॅम्प- सातगांव मुसळी

Page No.:

मा. डॉ. पी. एस. वायाळ सर

आज दि. २९/१२/२०१८ रोज शनिवारला, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे श्रम संस्कार शिबिराचे उद्‌घाटन कार्यक्रमासाठी भेट दिली असता सातगांव मुसळी येथे सरपंच तथा उपसरपंच व इतर गावकरी मंडळीसुद्धा मोठ्या संख्येने उपस्थित होते. कॅम्प परिसर उत्कृष्ठ व प्रसन्न वातावरण आढळले. विद्यार्थी व विद्यार्थीनी उत्स्फुर्तपणे सहभागी झाले. अत्यंत चांगल्या प्रकारचा सहभाग विद्यार्थ्यांनी घेवुन कार्यक्रम सादर केला.

विद्यार्थ्यांना शिबिराचे यशस्वीतेसाठी हार्दीक शुभेच्छा।

पी. एस. वायाळ

२९/१२/२०१८

प्राचार्य डॉ. पी. एस. वायाळ